# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२५**

**सन २०२५-२६ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**गुरुवार, दिनांक ११ डिसेंबर, २०२५**

## महसूल व वन विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ८**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: सी-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०२९, जमीन महसूल**<br>**बाब क्रमांक: ४१, रूपये:- ५,०८,००,०००/-**<br>**श्री. सुनिल प्रभू** |
| (१) | ९३७ | १० | मुंबई पश्चिम उपनगरातील कांदिवली, मालाड, बोरीवली येथील आर-उत्तर, आर-दक्षिण आणि आर-मध्य या महापालिका वार्डमधील ३५० हून अधिक घरे, इमारती, बांधकामे आणि चाळींना अनधिकृत ठरवून नोटीसा पाठविण्यात आल्या प्रकरणी उपनगरातील विकास आराखडा आरक्षणात भुमी अभिलेख कार्यालयातील जमिनीच्या हद्दीचे बनावट नकाशे तयार करणाऱ्या सबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे दि.१३.०९.२०२५ रोजी मुंबई उपनगर पालकमंत्री महोदयांनी निर्देश देण्यात येणे, उक्त प्रकरणात पाच वार्डमधील जमिनीच्या हद्दीचे बनावट नकाशे तयार करुन घरांना अनधिकृत ठरवून नोटीसा बजाविणाऱ्या महापालिकेच्या सबंधित दोषी अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्याकडे शासनाकडून झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: सी-६**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२४५, नैसर्गिक आपत्तींच्या निवारणासाठी सहाय्य**<br>**बाब क्रमांक: ४७, रूपये:- ३८,००,००,००,०००/-**<br>**श्री. सुनिल प्रभू** |
| (२) | ९४६ | १०० | राज्यात मराठवाडा आणि विदर्भ, मध्य आणि पश्चिम महाराष्ट्रात माहे सप्टेंबर,२०२५ च्या तिसऱ्या सप्ताहात झालेली अतिवृष्टी व महापुराच्या संकटामुळे ३० जिल्हयातील ५० लाख हेक्टर जमिन पाण्याखाली जाऊन शेती पिकाचे आणि शेतीचे तसेच पशुधनाचे प्रचंड प्रमाणात नुकसान होणे, जुन ते ऑगस्ट दरम्यान आणि माहे-सप्टेंबर,२०२५ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टीमुळे यंदाच्या वर्षामध्ये सुमारे ५० टक्याहून अधिक खरिप पिक वाहून जाणे तसेच शेतजमिन खरवडून गेल्यामुळे तुर, सोयाबीन, बाजरी, मका,उस, कापूस, ज्वारी,भाजीपाला, फळपिकांचे प्रचंड नुकसान झाल्याने शेतकऱ्यावर अर्थिक संकट कोसळून उपासमारीचे वेळ येणे, राज्य शासनाने किती बाधित क्षेत्रांचे पंचनामे केले करण्यास झालेला विलंब,यामुळे शेतकऱ्यांना अर्थिक मदत मिळण्याच्या लाभापासून वंचित रहावे लागणे. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (३) | ९८६ | १० | जुलै व सप्टेंबर २०२४ या कालावधीत राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर फटका बसला. या परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन शासनाने पाण्याने वाहून गेलेल्या किंवा गंभीरपणे खरडून गेलेल्या शेतीच्या भागासाठी हेक्टरी ४०,००० रुपये तसेच मनरेगा योजनांतर्गत ३,००,००० रुपयेअशी आर्थिक मदत देण्याची घोषणा केली होती.मात्र, उमरेड विधानसभा मतदारसंघात अनेक शेतकऱ्यांच्या खात्यात अद्याप केवळ १०,००० रुपये इतकीच रक्कम जमाझाल्याचे समोर आले आहे. जाहीर केलेली मदत आणि प्रत्यक्ष मिळालेली मदत यामध्ये ही दिसणारी तफावत शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण करणारी आहे. अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांची आर्थिक घडी बिघडलेली असताना, जाहीर केलेल्या मदतीचा तातडीने आणि पूर्ण स्वरूपात लाभ मिळणे अत्यंत आवश्यक आहे.उमरेड मतदारसंघातील पात्र शेतकऱ्यांना जाहीर केलेली ४०,००० रुपये प्रति हेक्टर मदत त्वरित व संपूर्णरित्या वितरित करण्यात यावी.मनरेगा योजनांतर्गत जाहीर केलेली ३ लाख रुपयांची आर्थिक मदत वितरण प्रक्रियेचा आढावा घेऊन प्रलंबित रकमेचे वेळेवर वितरण सुनिश्चित करावे.तसेच शेतकऱ्यांच्या खात्यात केवळ १०,००० रुपये जमा होण्यामागील कारणांची शासकीय पातळीवर तपासणी करून त्याबाबत विधानसभेत स्पष्ट माहिती द्यावी.मदत वितरणातील विलंब व विसंगती दूर करण्यासाठी संबंधित विभागांनी कार्यक्षम समन्वय ठेवून शेतकऱ्यांना संपूर्ण लाभ मिळेल याची खात्री करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. गजानन लवटे** |
| (४) | ९५२ | १०० | दर्यापूर अंजनगाव सुर्जी तालुक्यात गेल्या वर्षी माहे सप्टेंबर २०२४ मध्ये अतिवृष्टी झाली होती. या अतिवृष्टीमध्ये शेत पिकांचे व फळविकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून या नुकसानग्रस्त शेतपिकांची कृषी विभागामार्फत पाहणी करून अहवाल सुद्धा सादर करण्यात आला होता. परंतु, सुमारे वर्षभराचा कालावधी होत आला तरी अद्याप या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई देण्यात आलेले नसून विविध शेतकरी संघटना आंदोलनाच्या पावित्र्यात आहेत त्यामुळे यावर तातडीने कार्यवाही होणे गरजेचे आहे.तसेच दर्यापूर अंजनगाव सुर्जी तालुक्यात कापसाचे व सोयाबीनचे पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. परंतु, या पिकांना योग्य भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. तसेच कापसाची साठवणूक करण्याकरिता शेतक-यांकडे पुरेशी जागा उपलब्ध नसल्याने बहुदा शेतकरी घरातच कापसाची साठवणूक करतात. त्यामुळे या साठवलेल्या कापसाला आग लागून वित्त हानी सोबतच जीवित हानी होण्याच्या घटना ही अनेकदा घडल्या आहेत. तसेच या आगीमुळे झालेल्या नुकसानाची देखील भरपाई शेतक-यांना मिळत नाही. पश्चिम विदर्भात शेतमालाला योग्य भाव मिळत नसल्याने त्याचबरोबर अवकाळी पावसामुळे होत असलेले तीव्र नुकसान आणि त्याची न मिळालेली भरपाई यामुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांचे |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | आत्महत्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून यावर कायमस्वरूपी तोडगा काढणे गरजेचे झाले आहे.वर्षभरात या तालुक्यांमध्ये संत्रा, लिंबू, पानपिंपरी या फळ पिकांची देखील विविध अळयांच्या प्रादुर्भावामुळे मोठ्या प्रमाणावर फळ गळती झाली आहे. त्यातच घर म्हणून गेल्या महिन्याभरापासून " हुमणी अळी मुळे शेत पिकांचे व फळ पिकांचे नुकसान होत असून याचीही भरपाई अद्याप पर्यंत शेतकऱ्यांना मिळालेली नाही. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: सी-६**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२४५, नैसर्गिक आपत्तींच्या निवारणासाठी सहाय्य**<br>**बाब क्रमांक: ४८, रूपये:- १०,००,००,००,०००/-**<br>**श्री. संजय मेश्राम** |
| (५) | ९८४ | १० | उमरेड विधानसभा मतदारसंघातील उमरेड, भिवापूर व कुही या तिन्ही तालुक्यांमध्ये जुलै व सप्टेंबर २०२४ या कालावधीत सलग अतिवृष्टी झाली. या अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान झाले. त्या वेळी राज्य सरकारने बाधित शेतकऱ्यांना आर्थिक मदतीची घोषणा केली होती. परंतु, अत्यंत खेदाने नमूद करावे लागत आहे की, आज डिसेंबर २०२४ पर्यंतही मोठ्या प्रमाणातील शेतकऱ्यांना ही घोषित मदत प्रत्यक्षात मिळालेली नाही. यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले असून दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर येऊन ठेपले आहेत. या अत्यंत गंभीर परिस्थितीची दखल घेऊन मी सरकारकडे पुढील मागण्या करीत आहे. १. जुलै–सप्टेंबर अतिवृष्टीतील बाधित शेतकऱ्यांना जाहीर केलेली आर्थिक मदत तत्काळ वितरित करावी. २. ज्या गावांत किंवा शेतकऱ्यांकडे प्रस्ताव/यादी अडकली आहे ती तातडीने निकाली काढावी. ३. लेखा परीक्षण, प्रशासकीय कारणे किंवा तांत्रिक अडथळयांमुळे थांबलेली रक्कम त्वरित मुक्त करावी. ४. पूरक अंदाजपत्रकात (Supplementary Demands) या मदतीसाठी आवश्यक अतिरिक्त निधीची तरतूद करावी. ५. संपूर्ण प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्यासाठी जिल्हा प्रशासनाला विशेष निर्देश द्यावेत. शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान लक्षात घेता सरकारने ही मदत देण्यास आणखी विलंब करू नये, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: सी-६**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२४५, नैसर्गिक आपत्तींच्या निवारणासाठी सहाय्य**<br>**बाब क्रमांक: ४९, रूपये:- ९६,००,००,००,०००/-**<br>**श्री. सुनिल प्रभू** |
| (६) | ९५४ | १० | सांगली जिल्हयातील द्राक्ष पिके, पालेभाज्या व फळपिकाचे उत्पादक शेतकऱ्यांना पीजीआर कंपनीच्या सल्लागाराने कृषी विभागातील अधिकाऱ्यांबरोबर संगनमत करुन गेले दहा वर्षापासून त अद्यापपर्यंत बनावट औषधाचा पुरवठा व विक्री करुन कोटयावधी रुपयाचा अर्थिक गैरव्यवहार करुन यामध्ये जिल्हयातील हजारो |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | शेतकऱ्यांची अर्थिक फसवणूक करण्यात येणे, सदरहू कंपनीने मुंबई, ठाणे ठिकाणचा खोटा पत्ता देणे, शेतकऱ्यांना बनावट औषधांचा चढया दराने विक्री करणे, या कंपनीचा कार्यभार शासनाचे कृषी अधिकारी, कंपनी चालक, सल्लागार, वितरक, कृषी सेवा केंद्र चालक हे कृषी विभागातील अधिकाऱ्यांचे नातेवाईक असून, या नातेवाईकांच्या नावे असलेल्या बोगस कंपनीद्वारे औषध विक्रीचा गोरख धंदा सुरु असणे, सदर बाब शासनाच्या निदर्शनास येऊनही, शासनाने पीजीआर कंपनीचे मालक, व्यवस्थापन अधिकारी आणि कृषी विभागातील दोषी अधिकारी यांच्या विरुध्द कठोर कायदेशीर कारवाई करणेबाबत कोणतीच कार्यवाही न करणे, याबाबत शासनाने सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (७) | ९८५ | १० | जुलै व सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे राज्यातील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले होते. त्या अनुषंगाने राज्य शासनाने रब्बी हंगामासाठी शेतकऱ्यांना प्रति शेतकरी रु. १०,००० आर्थिक मदतीची घोषणा केली होती. तथापि, माझ्या उमरेड विधानसभा मतदारसंघातील अनेक पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात आजतागायत ही मदत जमा झालेली नाही.शासनाच्या वचनबद्धतेनुसार मदत तातडीने पोहोचणे अपेक्षित असताना प्रशासनिक उदासीनता, पडताळणीतील विलंब आणि आर्थिक मंजुरीची प्रक्रिया वेळेत पूर्ण न झाल्याने शेतकरी गंभीर अडचणीत आहेत. रब्बी पेरणी हंगाम मोठ्या प्रमाणात सुरू असून शेतकऱ्यांच्या उत्पादनक्षमतेवर त्याचा थेट परिणाम होत आहे.वरील परिस्थिती अत्यंत गंभीर असल्यामुळे आणि शासनाकडून घोषित केलेली आर्थिक मदत वेळेत न मिळाल्याने प्रदेशातील शेतकरी असंतोष व्यक्त करीत आहेत. म्हणून उमरेड मतदारसंघातील तसेच राज्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांना तातडीने जाहीर केलेली रु. १०,००० आर्थिक मदत अदा करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: सी-६**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२४५, नैसर्गिक आपत्तींच्या निवारणासाठी सहाय्य**<br>**बाब क्रमांक: ५२, रूपये:- २,८०,००,००,०००/-**<br>**श्री. बापूसाहेब पठारे** |
| (८) | ९८७ | १० | वडगाव शेरी विधानसभा मतदार संघात येरवडा, शांतीनगर, जाधवनगर, कळस, धानोरी लक्ष्मीनगर, मयूर किलबिल सोसायटी परिसर, लोहगाव रस्त्यावरील धानोरी जकात नाका, पोरवाल रोड परिसर, लोहगाव वाघोली रस्त्यावरील दादाची वस्ती, कर्मभूमी योजना नगर, पुणे नगर रस्त्यालगत खांदवे नगर, साई गणेश पार्क वडगाव शेरी, साईनाथ नगर करण आशियाना सोसायटी परिसर सेंट अर्नोल्ड शाळा परिसर या भागामध्ये पावसाळ्यामध्ये पावसाचे पाणी येऊन पूर सदृश्य परिस्थिती निर्माण होते नागरिकांची घरे पाण्यात जाणे सदर भागांमध्ये नाला अरुंद व नाला चॅनेलाईजिन केला नसल्यामुळे पाण्याचा प्रवाह नागरिकांच्या घरामध्ये येऊन |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | नागरिकांच्या साहित्याचे नुकसान होणे, त्यामुळे असंख्य नागरिकांना इतर ठिकाणी स्थलांतरित करावे लागणे, सदर ठिकाणी कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी सातत्याने मागणी करूनही विलंब होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

---

**विधान भवन**
**नागपूर,**
**दिनांक : १० डिसेंबर, २०२५**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) महसूल व वन विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर